**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक : १४८३-अ/२०२१**

**तक्रारकर्ता,** श्री.कृष्णा सी. गुप्ता,
एस/१०६, पटाडीया कॉम्पलेक्स,
गांधी नगर, स्मशान भूमी रोड,
भाईंदर (प), जि.ठाणे ४०१ १०१.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक
पोलीस आयुक्त, भाईंदर विभाग, मिरा भाईंदर
वसई विरार पोलीस आयुक्तालय, एम.बी.एम.सी.
मार्केट जवळ, स्टेशन रोड, भाईंदर प.,
ता.जि.ठाणे ४०१ १०१.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक
पोलीस आयुक्त, भाईंदर विभाग, मिरा भाईंदर
वसई विरार पोलीस आयुक्तालय, एम.बी.एम.सी.
मार्केट जवळ, स्टेशन रोड, भाईंदर प.,
ता.जि.ठाणे ४०१ १०१.

**तक्रार सुनावणीचा दिनांक** : **११/८/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| २८/६/२०२१ | ---- | १२/७/२०२१ | २८/७/२०२१ |

तक्रारकर्ता यांनी दि.१/१०/२०२१ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक ११/८/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस उभयपक्ष अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" To provide CCTV footage of the (Entire police station/Entrance passage/waiting area corridor/Cabin of Sr.P.I.) of the office of Uttan Police station. & etc"*

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.२८/७/२०२१ रोजी, "*सहायक जन माहिती अधिकारी यांनी ज्या अदखलपात्र गुन्हाबद्दल नमुद केले आहे त्यातील घटनास्थळ हे वेगळे असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८ (ज) मधील तरतुदीमध्ये लागु होत नाही. सबब मुद्दाचे अनुषंगाने अपिलार्थी यांना माहिती ७ दिवसात निःशुल्क पुरवावी असे आदेश प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना दिले. त्याबाबत अपिलार्थी यांना व्यवस्थित समजावुन सांगीतले.*" असा निर्णय दिलेला आहे.

उभयपक्ष सुनावणीस अनुपस्थित आहेत. सुनावणीची सूचना संबंधितांना प्राप्त झाल्याचे पोस्ट ट्रकिंग रिपोर्टवरून दिसून येत नाही.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. सदर प्रकरणी आयोग कार्यालयाने पुन्हा सुनावणी सूचना काढावी.
२. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.२९/९/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

**(शेखर चन्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ११ ऑगस्ट, २०२५ .

Comp-३